


NEHRU BAL PUSTAKALAYA

# कोणे एके काळी, एका गावी...

मदन

चित्रांकन

नीना बहल



ISBN-81-237-2702-X

पहिली आवृत्ती : 1991 (*शके* 1913)

पाचवी आवृत्ती : 2003 (*शके* 1924)

© मदन, 1988


मराठी अनुवाद © नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया, 1991

Once in a Village... *(Marathi)*

**रु. 12.00**

संचालक, नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया, ए-5 ग्रीन पार्क
नवी दिल्ली-110 016 यांनी प्रकाशित केले.

नेहरू बाल पुस्तकालय



# कोणे एके काळी, एका गावी...

मदन


अनुवाद

नरेश परळीकर

चित्रांकन


नीना बहल

नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया






खूप खूप वर्षं झाली. आटपाट गाव होतं. लहानसं. त्या गावात झाडं होती. झुडुपं होती. शेतं होती. पशू होते. पक्षी होते. तिथं राहाणारे गावकरी होते. गाव वसलं होतं एका नदीच्या किनारी. नदीवर गावातल्या स्त्रिया जमत. कपडे धूत. नहात असत. गावातली मुलं जमत. खेळत. उडया मारीत. नदीत डुंबत. मासे पकडीत.




शेतामध्ये धान्य पिके. भुईमुगाच्या वेली बहरून येत. मोहरीच्या पिवळ्या चुटुक फुलांनी शेतं फुलून जात. गावात छोटी छोटी तळे होती. त्यात कमलं उमलत. बदकं पोहत. बेडकांची कुटुंबं राहात.




गावात अनेक माणसं होती . आजोबा होते . आजीबाई होत्या . आई होती . बाबा होते . काका काकी होते . मामा मामी होते . मुलं होती, निरनिराळ्या वयाची . कांहीजण लठ्ठ होते . कांहीजण लुकडे . कांही उंच-लंबू तर कांहीजण ठेंगू . कांहीजण उतावळे तर कांही शांत . सारं गाव तसं आनंदात होतं . सुखात होतं .



पण एक वर्ष असं उजाडलं की—त्याचीच कहाणी आता तुम्हाला सांगणार आहे.
कहाणीची सुरूवात होते एका जंगलापासून. गावाच्या टोकाला होतं हे जंगल.
फार फार पुरातन जंगल. गावापेक्षाही पुरातन. गावसुध्दा तसं जुनंच होतं. जंगल त्याच्याहीपेक्षा जुने.



जंगल आणि गाव यांचं जिवाभावाचं नातं होतं. दोघांचं एकमेकांवर फार प्रेम. जंगल गावाला खाण्यासाठी फळं द्यायचं. घरं बनवण्यासाठी लाकूड. आजारपणात जुडीबुटी. आणि सा-यांना आवडणारी फुलं.



पण पुढं गावाची लोकसंख्या वाढायला लागली . आता तिथं खूपच आजोबा झाले . खूपखूप आजी झाल्या . खूप आया, खूप बाबा, काका काकी, मामा मामी यांच्या संख्या वाढू लागल्या . मुलं तर खूप झाली . त्यांना राहायला घरं कमी पडू लागली . धान्य पिकवायला शेतं कमी पडू लागली .

मग लोकांनी झाडं तोडायला सुरूवात केली .

शहाणीसुरती माणसं सांगत, ''झाडं तोडू नका, झाडं तोडू नका. झाडं आपले दोस्त आहेत. ते आपली काळजी घेतात. त्यांना आपण त्रास दिला, तर आपल्यावर संकट येईल.''


पण त्यांचं ऐकतं कोण?


कुणीही मोठ्या माणसांचं ऐकलं नाही.

हळू हळू जंगल कमी होत चाललं. झाडं तुटत चालली. शिल्लक राहिली फक्त लहान झुडपं.



गावात मात्र दोन झाडं उभी होती. अगदी घट्ट पाय रोवून. एक होतं पिंपळाचं म्हातारं झाड. त्याचं वय किती होतं, ते कुणालाच माहीत नव्हतं. दरवर्षी त्याला छोटी छोटी, कोवळी, त्रिकोणी पानं यायची. पिंपळाच्या जवळच उभं होतं वडाचं झाड. वयोवृद्ध आणि ज्ञानवृद्ध. त्याच्या खालच्या बिळांमध्ये राहात असत खारी.





वडाच्या पारंब्यांना धरून झोके घेतांना मुलांना मजा यायची. या दोन जुन्या वृक्षांच्या मधोमध उभा होता गुलमोहर. वसंत ऋतूत त्याला लाल भडक फुलं यायची.

मग एकदा काय झालं?

एके वर्षी पाऊसच आला नाही. गावातले लोक आभाळाकडं डोळे लावून बसू लागले. वर सूर्य तळपत होता.


'यावर्षी पाऊस उशिरा येणार दिसतोय,' ते मनाशी विचार करीत. पावसाची वाट पाहात. दिवसामागून दिवस गेले. आठवड्यामागून आठवडे. पण पाउस आलाच नाही.



पुढल्या वर्षीही पाऊस नाही. आकाश अगदी स्वच्छ. ढगाचं नाव नाही. सारखं ऊन तापायचं. लोक आपली वाट पाहायचे पावसाची. पण एकही थेंब पडला नाही.



मग तिस-या वर्षी तेच झालं. आता मात्र सगळ्यांना काळजी वाटायला लागली. अखेर पाऊस गायब तरी कुठं झाला? त्यांच्या डोळ्यात पाणी येऊ लागलं. कुठं गेले पावसाळी ढग? त्यांचा कुठेच पत्ता नव्हता.




चौथं वर्ष तसंच गेलं. पावसाचा पत्ता नव्हता. एक थेंब पडला नाही. गवत सुकायला लागलं. तलाव कोरडे ठणठणीत पडले. कमळाची फुलं सुकून गेली. बदकं गाव सोडून निघून गेली. नदी तर चिखलाचा एखादा ओघळ वहावा, तशी दिसायला लागली.

"हे तर आता सहन होत नाही," सगळ्यांना वाटायला लागलं. 'आम्ही झाडं तोडली, म्हणूनच का हे संकट आमच्यावर कोसळलंय?' 'आता मात्र पाऊस पडला, की आम्ही झाडं लावू. खूप खूप झाडं लावू'. लोक म्हणायला लागले. 'आम्ही झाडांना पाणी घालू. त्यांची मशागत करू. त्यांना वाढवू. आता तर पाऊस पडायलाच पाहिजे.' पण धरित्री कोरडीच राहिली व तप्त सूर्याच्या खाली तापत राहिली.

कदाचित आता पुढच्या वर्षी पाऊस पडेल.





त्याच्या पुढल्या वर्षीही पाऊस पडला नाही. "जर पाऊस असा पडलाच नाही, तर आम्ही मरून जाऊ. प्रत्येकजण रडायला लागला. जी झाडं शिल्लक राहिली, त्यांनी आपली उरलीसुरली पानं झाडून टाकली आणि आपल्या फांद्या आभाळाकडं पसरून तटस्थ उभी राहिली. सारे प्राणी उदास होऊन बसू लागले. पक्ष्यांचे करुण स्वर उमटू लागले, "पाणी.....पाऊस.....पाऊस.

"देवा, पाऊस पाड," सुकलेल्या नदीनं करुणा भाकली.

"ये रे ये रे पावसा," तळी रडायला लागली. बिचारी एके काळी पाण्यानं तुडुंब भरलेली होती.

"पाऊस....पाऊस.....पाऊस....बेडकांचं डराँव डराँव सुरू झालं.

"देवा, पाणी दे." पक्ष्यांचा किलकिलाट. जनावरंही पाऊस मागायला लागली.

सुकलेल्या शेतांनी पाऊस मागायला सुरुवात केली.



सगळ्यांनी हात जोडून प्रार्थना म्हटली, "पाऊस पडू दे. पाऊस पडू दे."

सगळ्यांच्या डोक्यात एकच विचार. सगळयांच्या तोंडी एकच प्रार्थना. सगळ्यांच्या मनात एकच इच्छा.

पाऊस......पाऊस......पाणी.....पाणी.....


तर मग एके दिवशी, प्रत्येकाच्या डोक्यातील एक विचाराने, प्रत्येकाच्या मुखातील एक प्रार्थनेने आणि प्रत्येकाच्या मनातील एकाच इच्छेने, अशा एका शक्तीचे रूप धारण केले आणि ती शक्ती वाढत वाढत इतकी वाढली की, आकाशाला जाऊन भिडली . आकाशात जाऊन तिनं एका ढगाचं रूप धारण केलं .



'पहा, पहा', सगळे लोक आनंदानं ओरडले. जसजसे ते वरवर पाहात राहिले, तसे त्यांना दिसायला लागले, तो ढग पाहाता पाहाता निरनिराळ्या रंगात बदलू लागला. केशरी, नारिंगी, पिवळा, हिरवा, लाल, गुलाबी, जांभळा. मग हे सगळे रंग एकत्र होऊन भुरे झाले. मग नंतर काळे झाले.



सगळ्यांचे डोळे अद्भुत ढगावर लागले. नंतर दूर आकाशात ढगांच्या मागे वीज चमकली. त्या आवाजाबरोबर एकदम घनदाट मेघ दाटून आले. सर्व दिशांनी धावत पळत ते येऊ लागले. थोड्याच वेळात सारे आभाळ त्यांनी झाकाळून टाकले. त्यांनी सूर्याचा चेहरा झाकून गेला.



निरनिराळ्या दिशांनी पुन्हा कैक वादळे आली. ढग गर्जायला लागले. गडगडाट होऊ लागला. वादळ घोंगाऊ लागले.

मग टपटप थेंब पडू लागले. पावसाचे थेंब. धरित्रीवर पाऊस कोसळू लागला. सुकलेल्या गवतावर, पशु-पक्ष्यांवर, सगळ्या लोकांवर. जोरजोरात सरी कोसळू लागल्या.




सगळे लोक खूष झाले. वा...वा...पाऊस...पाऊस...पाणी छान छान पाऊस. मग रिमझिम पाऊस मुसळधार पावसात बदलला. काळ्या काळ्या ढगातून पावसाच्या धारा बरसू लागल्या. प्रत्येकजण आपापले हात उंच करून आनंदाने गाऊ लागला. नाचू लागला.


बाबा—आजोबा, आई, काका, काकी, सारी मुलं आनंदाने नाचू लागले. पशू, पक्षी, बेडूक सगळ्यांनी नाच सुरू केला.





सगळेजण नाचू लागले. खरंच"का सगळे नाचू लागले? नाही. सगळेच कांही नाचत होते असे नाही. पिंपळ आणि वड मात्र नाचत नव्हते. आभाळ, धरित्री आणि पाऊस यांच्याकडे पाहात ते स्तब्ध उभे होते. "आम्ही तर आता खूप म्हातारे झालों. आम्ही नाचू शकत नाहीत. आम्ही एक गाणं गाऊ. सगळ्यांना धन्यवाद देऊ. या पावसासाठी धन्यवाद. या जीवनदायी वर्षासाठी धन्यवाद.





Printed at Aravali Printers & Publishers Pvt. Ltd., Okhla, Phase-II, N.D.-20

रु. 12.00 ISBN 81-237-2702-X

नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया

